राज्यात सध्या शिक्षक भरतीचा भ्रष्टाचाराचा विषय चर्चेत असतानाच, बीडच्या शिक्षण विभागात ५०० कोटींचा घोटाळा उघडकीस!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कंर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २४४ ■ शुक्रवार दि.२३ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 244 ■ Friday Dt.23 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4



बीड जिल्ह्यात शिक्षक भरतीमध्ये खासगी संस्थाचालक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा महाघोटाळा?

प्राथमिकचे शिक्षणाधिकारी फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी शिंदे यांच्या प्राथमिक चौकशीचे आदेश राज्याच्या शिक्षण विभागाने दिले?

■ शिक्षणमंत्री दादा भुसे साहेब, बोगस शिक्षक भरतीचा भांडाफोड करून सगळ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश द्या?

■ शिक्षण विभागात ५०० कोटींचा घोटाळाप्रकरणी शिक्षणाधिकारी कारवाईच्या रडारवर?

■ बोगस शिक्षक भरतीच्या प्रकरणानंतर शिक्षण विभागात भ्रष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ माजली?

■ बीडच्या शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार; या घोटाळ्यांची गंभीरपणे चौकशी करण्याची गरज?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागातील प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे हे रूजू झाल्यापासुन शिक्षण विभागामध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू आहेत. यामध्ये खाजगी शिक्षण संस्था व अल्पसंख्यांक शिक्षण संस्था अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शाळांमध्ये शासनाचे सर्व नियम डावलून संस्था चालकांकडून आर्थिक देवाण घेवाण करून शिक्षक पदभरती करणे तसेच शिक्षकांना कायम मान्यता देणे अशा प्रकारची बेकायदेशीर कामे करून करोडो रूपयांचा भ्रष्टाचर केलेला आहे. तसेच याचप्रकारे त्यांच्या अंतर्गत येणारी शिक्षण विभागाची इतर कामामध्येही ते पैसे घेतल्याशिवाय सही करत नाहीत अशा प्रकारे त्यांनी अमाप बेकायदेशीर संपत्ती गोळा केलेली आहे.

जिल्ह्यात मागील अनेक दिवसांपासून प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षण भरतीमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष सादिक इनामदार यांनी केला आहे. याबाबत त्यांनी राज्याच्या शिक्षण मंत्र्याकडं तक्रार केली आहे. यामध्ये जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी आणि माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी यांनी मोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप सादिक इनामदार यांनी केली आहे. नागपूरमध्ये शिक्षक भरती प्रकरणी चौकशी सुरू आहे. यासोबत बीड जिल्ह्यातही शिक्षक भरतीमध्ये खासगी संस्थाचालक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमतानं कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचं पाहायला मिळत आहे. सदरील अधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर करत केली शासनाची फसवणूक केली आहे. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी शिक्षण अधिकारी प्राथमिक आणि माध्यमिक यांना शासनाच्या नियमानुसार शासनाच्या अधीन राहून शिक्षक भरती संदर्भात आपल्या स्तरावर निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. परंतु, त्यांनी असं न करता पदाचा गैरवापर करून शासनाची फसवणूक करत करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. संस्था चालकांना कोट्यवधी रुपयांचे थकीत वेतन वितरित करून शिक्षक भरती घोटाळा आणि खासगी शिक्षण संस्थेमधून विनाअनुदानित शिक्षकांना देयके दिली आहेत.

शिक्षण विभागाने दिले अधिकाऱ्यांच्या चौकशीचे आदेश

बीड जिल्ह्यातही प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षक भरतीत मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचे आरोप होत आहेत. याबाबत भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष सादिक इनामदार यांनी राज्याच्या शिक्षण मंत्र्यांकडं तक्रार केली होती. यावरून प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांच्या प्राथमिक चौकशीचे आदेश राज्याच्या शिक्षण विभागानं दिले आहेत.

बोगस शिक्षक भरतीचा होणार भांडाफोड

राज्यात सध्या शिक्षक भरती घोटाळा चर्चेचा विषय बनला आहे. नागपूरमध्ये देखील शिक्षक भरती प्रकरणी चौकशी सुरु झाली आहे. बीड जिल्ह्यातही शिक्षक भरतीमध्ये खासगी शिक्षण संस्था चालक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी संगनमत करुन कोट्यवधींचा घोटाळा केल्याच्या तक्रारी आहेत. पवित्र पोर्टलमध्ये खेळ करत शिक्षकांना नियुक्त्या देण्यात आल्या आणि त्या नियुक्त्यांना शिक्षण विभागाने मान्यताही दिली अशा तक्रारी आहेत. विशेष म्हणजे यासंदर्भातील कोणतीच माहिती दिली जात नव्हती. एवढंच नाही तर, माहिती अधिकारात देखील माहिती द्यायला शिक्षण विभाग तयार नाही. या संपूर्ण प्रकरणात शेकडो कोटींची उलाढाल झाल्याच्या तक्रारी होत्या. या संदर्भात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष सादिक इनामदार यांनी राज्याच्या शिक्षण मंत्र्यांकडं तक्रार केली होती. त्यात प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी ५०० कोटींचा भ्रष्टाचार केल्याचं म्हटलं होतं. यावर शिक्षण मंत्र्यांनी शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना चौकशीचे निर्देश दिले होते. त्यानुसार शिक्षण विभागाने आता राज्याच्या शिक्षण आयुक्तांना या प्रकरणात प्राथमिक चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातही बोगस शिक्षक भरतीचा भांडाफोड होणार असं सध्या तरी दिसून येत आहे.

बीडमध्ये दि. २४ मे रोजी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

सीमेपलीकडून वारंवार होणाऱ्या भ्याड हल्ल्यांना भारतीय सैन्याने दिलेले रोकठोक प्रत्युत्तर हे केवळ युद्धाचे नव्हे तर भारतमातेच्या वीर पुत्रांची शौर्यगाथा लिहिणारे आहे. या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी आणि मातृभूमीसाठी बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात दि.२४ मे २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता देशभक्तीने ओथंबलेली भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली असून या ऐतिहासिक रॅलीस महाराष्ट्र राज्याचे सामाजिक

तिरंगा रॅलीत सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती लाभणार!

पान २ वर

शूरवीर सैनिकांसाठी, चला एक होऊ देशासाठी– जगताप, मुळूक, गलधर

देशाच्या मातीसाठी, आपल्या लेकरांसाठी, आपल्या भविष्यासाठी शूरवीर जवान आपल्या प्राणांची आहुती देतात. त्या शूरवीरांना आपण एक सुजाण भारतीय नागरिक असल्या नात्याने एकत्रित येऊन वंदन करायला हवे. ही तिरंगा रॅली आपल्या सैनिकांच्या बलिदानाचे स्मरण आणि त्यांच्या शौर्याची गाथा गाण्याचा एक पवित्र क्षण असणार आहे. यामुळे बीडवासियांनी जास्तीतजास्त संख्येने तिरंगा रॅलीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक आणि स्वप्निल गलधर यांनी तमाम बीडवासियांना केले आहे.

उपोषणाचा आजचा चौथा दिवस; जिल्हा प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

दौनापूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कमानीसाठी उपोषणाला बसलेल्या आंदोलनकर्त्यांची प्रकृती खालावली

कमान उभारण्यास जातीवादी भावनेतून विरोध करणाऱ्यांवर ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार गुन्हे दाखल करण्याची मागणी

परळी । प्रतिनिधी

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कमान प्रवेशद्वार उभारण्यासाठी परळी तालुक्यातील दौनापूर येथील समस्त बौद्ध समाजाने ग्रामपंचायत कार्यालयात रीतसर परवानगी मागितली होती. सरपंच व इतर ग्रामपंचायत सदस्यांनी ज्या ठिकाणी कमान उभारण्यात येणार होती त्या जागा मालकाबरोबर संगणमत करून ग्रामपंचायतचा ठराव घेऊन कमान उभारणीस लेखी विरोध केलेला आहे. यामुळे दौनापुर येथील बौद्ध समाज यांनी गटविकास अधिकारी तसेच तहसीलदार उपजिल्हाधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी कळवले होते परंतु राजकीय दबावापोटी कसलीही कारवाई झालेली नसल्यामुळे. दि.२० मे पासून बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरपंच तसेच कमान उभारण्यास जातीवादी भावनेतून विरोध करणाऱ्या आरोपी विरुद्ध ट्रॉसिटी क्ट नुसार गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषण चालू आहे. या उपोषणाला आजचा चौथा दिवस असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. तसेच उपोषणाला बसलेल्या आंदोलनकर्त्यांची

प्रकृती खालावली आहे. यामुळे जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तसेच या आंदोलनाची दखल घेऊन दोषींवर ट्रॉसिटी क्ट नुसार गुन्हे दाखल करण्याची मागणी केली जात आहे. याप्रकरणी कसलीही कारवाई झाली नाही तर दि.२४ मे पासून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात पक्षाच्या वतीने जिल्हाभरात तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

धनादेश न वटल्या प्रकरणी आरोपींची निर्दोष मुक्तता

बीड । प्रतिनिधी

बीड येथील मा.प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी साहेब बीड यांनी मौजे जीरेवाडी ता. जि. बीड येथील १४ लक्ष रुपयाचा धनादेश अनादारीत प्रकरणी आरोपी कल्याण विठ्ठल कापसे रा. जीरेवाडी ता. जि. बीड व सर्जेराव माणिकराव मोहिते रा. जीरेवाडी ता. जि. बीड यांच्यावर एन. आय. ॲक्ट च्या कलम १३८ अन्वये मा. न्यायालयात फिर्याद दाखल केली होती. सदर प्रकरणात ग्रामपंचायत अंतर्गत पाणी पुरवठ्याच्या कामातील पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्याच्या मोबदल्या प्रकरणी १४ लक्ष रुपयाचा धनादेश दिला होता. सदर धनादेश अनादारीत झाला अशा आशयाची फिर्याद दाखल केली होती. सदर प्रकरणात साक्षी पुराव्यांती व आरोपी तर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्यावरून तसेच आरोपींच्या वकिलांचा प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी विरुद्ध गुन्हा सिद्ध झालेला नाही म्हणून प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी साहेब बीड यांनी आरोपी कल्याण विठ्ठल कापसे व सर्जेराव माणिक मोहिते दोघेही रा. जीरेवाडी ता. जि. बीड यांना सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात आलेले आहे असा आदेश केलेला आहे. सदर प्रकरणात दोन्ही आरोपी तर्फे ॲड. शिवाजी दाजीबा साळवे यांनी कामकाज पाहिले व त्यांना ॲड. प्रविण अ. जावळे आणि ॲड. मिलिंद वाघमारे यांनी सहकार्य केले.

आरसीसीच्या मुतारीनंतर पत्र्याच्या शेडचे दोन उकिरडे

बीड नगर परिषदेचा अभिनव उपक्रम!; जिल्हाधिकारी यांनी सखोल चौकशी करावी : एस.एम.युसूफ

बीड । प्रतिनिधी

शहरातील नवीन भाजी मंडई येथे काही दिवसांपूर्वी रात्रीतून पत्र्याचे दोन शेड बनविण्यात आले आहे. यापूर्वी सुद्धा बीड नगर परिषदने विकासाच्या नावाखाली राजुरी वेस समोर आरसीसी चे गाळे निर्माण केले होते. तिथे गेल्या अनेक वर्षांपासून मुतारी झाली आहे. तर या नुकत्याच बांधण्यात आलेल्या भाजी मंडईत दोन पत्र्याचे शेड उकिरडे झाले आहे. यामुळे लोक आता बीड नगर परिषदचे अभिनव उपक्रम आरसीसीच्या मुतारीनंतर पत्र्याच्या शेडचे दोन उकिरडे असे उपहासाने म्हणू लागले आहेत. जिल्हाधिकारी यांनी याप्रकरणी सखोल चौकशी करावी अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शासन-प्रशासन कधी काय करतील याचा नेम नसतो. अशाच प्रकारे बीड नगर परिषद सुद्धा कधी काय करेल किंवा करायला लावेल याचाही नेम नसतो. काही वर्षांपूर्वी बीड नगर परिषदेकडून मोठा गाजावाजा करत तत्कालीन नगराध्यक्षांनी ऐतिहासिक राजुरी वेस समोर असलेल्या रस्त्यालगतच्या पार्किंगच्या जागी अगडबंब नाल्याला खेटून व्यावसायिक तत्त्वावर देण्यासाठी आरसीसी चे गाळे बनविले होते. या अनधिकृत व्यावसायिक गाळ्यांमुळे शहरातील हक्काचा असलेला एक पार्किंग स्थळ गिळंकृत करण्यात आल्याने यावर एका नागरिकाने आक्षेप घेत थेट न्यायालयात याचिका दाखल केली होती. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असताना आता बीड नगर परिषदने काही दिवसांपूर्वी नवीन भाजी मंडई येथे भाजी विक्रेत्यांना बसण्यासाठी म्हणून एका रात्रीतून पत्र्याचे दोन शेड बांधले. हे शेड बांधण्याकरिता एवढी घाई, एवढी युद्ध पातळी का दाखविण्यात आली असे प्रश्न या दोन शेडच्या निर्माणानंतर उपस्थित होऊ लागले आहे. हे दोन शेड बनविण्या अगोदर या जागेवर भाजी विक्रेते कचरा आणि उरलेला भाजीपाला टाकून जायचे. तो बीड नगर परिषदकडून जेसीबी ने काढून घेतला जायचा. आता या पत्र्यांच्या शेडमुळे येथे टाकलेला कचरा व भाजीपाला जेसीबीने उचलता येणार नाही. कुणाला लहरीने या मोकळ्या जागी जमिनीपासून एक दीड फूट उंच वट्टे तयार करून त्यावर पत्र्याचे भले मोठे दोन शेड चक्क रात्रीतून बांधण्यात आले. येथे शेड जरी बांधण्यात आले असले तरी त्या वट्ट्यांवर एकही भाजीपाला विक्रेता बसत नाहीये.

त्यांची तशी इच्छाही नाहीये ही वस्तुस्थिती आहे. या अगोदरही याच भाजी मंडई मध्ये जमिनीपासून पाच-सहा फूट उंचीचे अनेक वट्टे आणि त्यावर शेड बांधलेले आहे. तिथेही भाजीपाला विक्रेते बसत नाही. सर्व भाजीपाला विक्रेते मंडईच्या आत असलेल्या सर्व रस्त्यांच्या दुतर्फा बसून भाजीपाला विकतात. ग्राहक ही तिथूनच खरेदी करतात. हा सर्व भूतकाळ वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ बीड शहरातील राजकारणी असो, अधिकारी असो, अभियंते असो, कर्मचारी असो की, बीड नगर परिषद असो यांना माहीत नाही असे नाही. तरीपण एका रात्रीतून हे शेड बांधण्यामागे काय गौडबंगाल आहे हा प्रश्न आहेच. काहीही गरज नसताना आणि कुणाची मागणीही नसताना भाजी मंडईतील हे दोन शेड का बनविण्यात आले? यात राजकारणी, बीड नगर परिषद, मुख्याधिकारी, अभियंता, कर्मचारी यापैकी कोणी-कोणी आर्थिक डल्ला मारला हा चौकशीचा विषय आहे. अशा प्रकारे जनतेकडून जमा झालेल्या महसुलाची उधळपट्टी केली जात आहे. याची सखोल चौकशी जिल्हाधिकारी यांनी करावी अशी मागणी मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

नवनीत काँवत साहेब चौसाळा चेकपोष्ट सुरू होणार का? चौसाळा बायपासवरील वाटमारी थांबणार का?

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा परिसरात सध्या चोरटयानी धुमाकुळ घातला असुन कालच पालसिगन शिवारातील पवनचक्की कपनीच्या क्रास आर्म कट करून तब्बल २ हजार १३२ फुट ल्युमिनियम तारेची चोरी केली होती. या तारेची किमत २लाख ५०हजार रुपये इतकी आहे. तसेच चौसाळा बायपासवरती अनेक लोकांना लुटयाच्या घटना घडल्या आहेत या बायपास वरती राञी अपराञी सर्वसामान्याना वावरणे कठीण होवुन बसले आहे चार दिवसापुर्वी सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांना देखील लुटण्याचा प्रयत्न झाला होता तसेच चौसाळा येथील पांडुरंग कळासे या शेतकरयाच्या घारगाव शिवारातुन दहा शेळया चोरी झाल्या होत्या या शेळयाची किंमत सव्वा लाखाच्या घरात असल्याची माहीती मिळाली आहे तसेच हिगणी नजीक दोन झोडप्याना दुचाकी आडवी लावून त्यांच्या जवळील रोख रख्खम व मोबाईल घेऊन हे चोरटे पसार झाले होते तसेच काल राञी महाजनवाडी येथील पवनचक्की प्रकल्पावर चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या चोरटयावर सिक्युरिटी गार्डने केलेल्या गोळीबारात एक जण ठार झाल्याची माहीती मिळाली आहे चौसाळा परिसरात चोरयाचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढले असुन बायपास वरती दुचाकी चालकाना लुटण्याचे घटना घडत असल्यामुळे चौसाळा बायपासवरती तात्काळ चेकपोष्ट देण्यात यावे व याठिकाणी गस्त वाढवून चौसाळा पोलीस चोकीला पोलीस कर्मचारी सख्या वाढविण्यात यावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिक करताना पाहावयास मिळत आहे.

तालुक्यातील दक्षता समित्या केवळ बैठकांपुरत्याच

रेशन पुरवठा पारदर्शक होतोय का? तक्रारी ऐकणार कोण?; नागरिकांची होरपळ

पात्रुंड । प्रतिनिधी

रेशन पुरवठा पारदर्शक व्हावा आणि सार्वजनिक वितरण प्रणालीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुकास्तरीय, ग्रामीण पातळीवर दक्षता समित्या गठित करण्यात आल्या. परंतु, केवळ बैठकीला हजेरी लावण्यापर्यंतच या समित्यांचे कार्य मर्यादित झाल्याने अनेक गावांतील समित्या केवळ कागदावरच असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीवर अंकुश रहावा, पारदर्शक व्हावी, ग्राहकांच्या तक्रारींचा निपटारा व्हावा, यासाठी तालुकास्तरीय दक्षता समिती गठित केली जाते. याप्रमाणे गावपातळीवर दक्षता समिती गठित केली जाते. समित्यांची मासिक बैठक दर महिन्याला झाली पाहिजे. परंतु, या बैठकी ३-३ महिने, तर कधी-कधी ६ महिने होत नाही. परिणामी, नागरिकांच्या तक्रारी ऐकूण घेणेच होत नाही. परिणामी, नागरिकांची होरपळ होताना दिसून येत आहे.

तक्रारींचे निवारण होण्यास अडचणी

तालुकास्तरावरील व गावपातळीवरील दक्षता समितीच्या बैठका प्रत्येक महिन्याच्या घेण्यात याव्यात. तसेच या बैठकांची माहिती जनतेला व्हावी, यासाठी त्याबाबत प्रसिद्धी देण्यात यावी. जनतेकडून पुरवठा विभागाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर या बैठकांमध्ये चर्चा करावी व प्राप्त तक्रारींचे निराकरण करावे. अशा सूचना शासनाच्या आहेत. मात्र, परिस्थिती प्रत्यक्षात उलट आहे. बहुतांश दक्षता समिती कागदावरच आहेत.

गावपातळीवर यांचा असतो समावेश

ग्रामीण भागात दक्षता समित्यांची बैठक होत नसल्याचे दिसून येते. या समितीचे अध्यक्ष सरपंच, तर ग्रामसेवक, तलाठी, पोलिस पाटील व ग्रा. पं. सदस्य त्या समितीचे सदस्य असतात. ग्रामपातळीवर दक्षता समितीमध्ये शासकीय आणि अशासकीय मिळून १३ सदस्यांची नियुक्ती करण्यात येते.

तालुकास्तरावर यांचा असतो समावेश

तालुकास्तरीय दक्षता समिती अध्यक्ष तहसीलदार असतात. तर नायब तहसीलदार, पुरवठा अधिकारी सचिव असतात. तालुका शासकीय आणि अशासकीय मिळून एकूण १७ सदस्यांचा यात समावेश असतो. सर्व समित्यांवरील शासकीय सदस्यांपैकी ५० टक्के सदस्य महिला निवडने बंधनकारक आहे.

देवस्थान इनामी जमिनीची बेकायदेशीर खरेदी-विक्री थांबवा

अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलने करून : ॲड.ए.एन. सय्यद

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत येणाऱ्या देवस्थान इनामी जमिनीची खुलेआम खरेदी - विक्री होत असून जिल्हा वक्फ अधिकारी यांनी तातडीने पंचनामे करून अवैध खरेदी - विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर गुन्हे दाखल करावे अशी मागणी आंबेडकरी विचार मोर्चा तथा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे बीड जिल्हाध्यक्ष एड. ए.एन सय्यद यांनी जिल्हा वक्फ अधिकारी यांना दिलेल्या एका निवेदनातून केली आहे.

असे की, बीड जिल्ह्यातील वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत येणाऱ्या देवस्थान इनामी जमिनीची जिल्हाभरात स्थानिक नेते व भू माफिया यांच्या संगणमताने खुलेआम मोठ्या प्रमाणात खरेदी - विक्री होत आहे व त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात बोगद खालचे सुद्धा झाले असून या संदर्भात आंबेडकरी विचार मोर्चा तथा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने वेळोवेळी जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय येथे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून असे एकूण बारा अर्ज जिल्हा वक्फ अधिकारी यांना देण्यात आले होते तरी वरील प्रकरणे

जिल्हा व अधिकारी यांनी उदासीनता दाखवून आज पर्यंत अवैध प्रकारे होत असलेल्या खरेदी - विक्रीवर प्रकरणी कसलीही कार्यवाही केली नसल्याने हे सर्व प्रकार जिल्हा वक्फ अधिकारी यांच्या संगनमताने होत असल्याचे दिसत आहे. जिल्हा वक्फ अधिकारी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग न करता त्यांनी आपला मनमानी कारभार थांबवावा. जिल्ह्यातील वक्फ मंडन कार्यालय अंतर्गत १९६० ते २०२५ पर्यंत देवस्थान इनामी जमिनीचे एकूण किती खालसे झालेले आहेत व त्याचप्रमाणे बीड जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय अंतर्गत किती इनामी जमीन खिदमत माशा आहे व किती इनामी जमीन मदत माश आहे व मंडळ अंतर्गत येणाऱ्या किती जमिनीची विरासत झालेली आहे, किती जमिनीची विरासत झालेली नाही व किती जमिनींची अजून बाकी आहे, किती जमिनी वादग्रस्त आहे व किती जमिनींचे कोर्टात स्टे ऑर्डर आहे याची सविस्तर माहिती देण्यात यावी व त्याचप्रमाणे ज्या जमिनींची विराच झाली नाही त्या जमिनी तातडीने लावणी काढण्यात यावी.

तरी जिल्हा वक्फ अधिकारी यांनी अवैध प्रकारे खरेदी - विक्री प्रकरणी तातडीने पंचनामे करून वक्फ अधिनियम १९९५ कलम ५२ (१) (अ) प्रमाणे अवैध प्रकारे खरेदी - विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर गुन्हे दाखल करावे अन्यथा आंबेडकरी विचार मोर्चात आथा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने सय्यद सलीम बाबू (मराठवाडा अध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली तथा बीड जिल्हाध्यक्ष एड.ए.एन सय्यद यांच्या नेतृत्वाखाली लोकशाही मार्गाने येत्या २६ मे सोमवार रोजी सकाळी ११:०० वाजल्यापासून बीड जिल्हा वक्फ कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल, असे आंबेडकरी विचार मोर्चात, आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने जिल्हा वक्फ कार्यालय बीड येथे दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

आष्टी तालुक्यात अवकाळी पावसाचा कहर; ढगफुटी सदृश्य पाऊस ऐन उन्हाळ्यात नदी नाल्यांना पूर

धो-धो पाऊस कांदाचाळीत पाणी,शेताला तळ्याचे स्वरूप,जमीनी खोदून गेल्या,रस्ते वाहून गेले,घरांची पडझड सांगवीत विज पडुन गाई व कालवडीचा मृत्यू ,ब्रम्हगांवह व चिंचाळ्यात कांदाचाळीत पाणी ,बावीत पत्रे उडाले तहसिलदार वैशाली पाटील,कृषी अधिकारी गोरख तरटे शेतकऱ्यांच्या बांधावर नुकसान ग्रस्त भागाची केली पाहणी

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यात मागील पंधरा दिवसांपासून अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वादळी वाऱ्यासह येणाऱ्या पावसामुळे अनेक झाडे उन्मळून पडली असून विजेच्या ताराही तुटल्या आहेत.घरावरील पत्रे उडाले या मान्सूनपूर्व पावसाचा मोठा फटका हा बसला आहे. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. फळबागा उद्धस्त झाल्या आहेत. या पावसामुळे काही ठिकाणी दुर्घटना देखील घडल्या आहेत. दरम्यान, आता पुन्हा काल दि.२२ मे रोजी दुपारी ४ ते ५ तास धो-धो पाऊस झाल्याने नदी ओढ्यांना पूर आला होता. घरांची पडझड वीज पडून जनावरांचा मृत्यू झाला आहे. गाय, कालवड पशुधन दगावले आहेत. तसेच घरांची पडझड होऊन नागरिक बेघर झाले. शेतकऱ्यांच्या फळबागा, तृणधान्य आणि भाजीपाल्यांचे मोठ्या प्रमाणात शेतातील कांदा, भुईमूग पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.काही शेतकऱ्यांच्या कांदाचाळीत पाणी शिरले तर भुईमूगाला शेंगा आल्या सांगवीत विज पडुन गाई व कालवडीचा मृत्यू झाल्याची घटना तर ,ब्रम्हगांवह व चिंचाळ्यात कांदाचाळीत पाणी ,बावीत पत्रे उडून मोठे

नुकसान झाले आहे.तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.तहसिलदार वैशाली पाटील,कृषी अधिकारी गोरख तरटे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसान ग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करण्याचे आदेश तलाठी व कृषी विभागाला दिले आहेत.

मान्सून पूर्व पावसामुळे आष्टी तालुक्यात मे महिना सुरू झाल्यापासून अवकाळीने थैमान घातले आहे. यामुळे कांदा पिकाची नासाडी तर फळबाग उद्धस्त झाल्या आहेत. अनेक वर्षांनंतर मे महिन्यात पिकांना अवकाळीचा इतका मोठा फटका बसला आहे. काल गुरुवारी दि.२२ मे रोजी दुपारी जोरदार वादळी वाऱ्यासह मान्सून पूर्व पावसाने हजेरी लावली तब्बल ४ ते ५ तास पावसाने जोरदार बॅटिंग केल्याने नदी नाल्यांना पूर आला होता.पूर परिस्थिती निर्माण झाली होती.रात्री झालेल्या पावसामध्ये मौजे सांगवी पाटण येथे दत्तु विठ्ठल भोसले यांची एक गाय व कालवड वीज पडून मृत्यू झाली आहे. मौजे बावी येथील मच्छिंद्र त्रिंबक लटपटे यांच्या काल रात्रीच्या अवकाळी पाऊस आणि वाऱ्यामुळे गाईच्या गोठ्यावरील पत्रे उडून गेले आहेत. ब्रम्हगांव येथील शेतकरी संतराम वायकर यांचा कांदा पिकाचे काल झालेल्या पावसाने नुकसान झाले आहे. तालुक्यात आज ही सकाळपासून पाऊस सुरू आहे. अजूनही दररोज अवकाळी पाऊस कहर करत असल्याने नुकसानीचा आकडा वाढू शकतो. सर्वाधिक फटका फळबागा, कांदा, भाजीपाला व आंबा, भुईमूग पिकाला बसला आहे. मात्र अवकाळी पाऊस थांबायचे नाव घेत नसल्यानं नुकसानग्रस्त पिकांचा आकडा रोजच वाढत आहे.

उन्हाळ्यात पूरस्थिती मे महिन्यात नदीला पूर येण्याची ही पहिलीच वेळ असल्याची माहिती नागरीकांनी दिली. या पाणीसाठ्यामुळे भविष्यात पाणी टंचाई भासणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.दुर्घटना देखील घडल्या आहेत.शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले असून तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी केली जात आहे.

नापिकी, कर्जबाजारीमुळे बळीराजा झाला हवालदिल

ग्रामीण भागातील शेतकरी सावकारांच्या कर्जाच्या विळख्यात

पात्रुड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांवर सावकारांच्या कर्जाचा फास घट्ट होत आहे. आज अनेक शेतकऱ्यांना सावकाऱ्यांच्या सापळ्यात अडकून त्यांची जमीन, घरे आणि संपत्ती गमावावी लागत आहे. सावकारांच्या वर्तनामुळे शेतकऱ्यांचे कष्टमय जीवन आणखी वेदनादायी बनत आहे. कृषी उत्पादनाच्या किमतीत घट, नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान, उत्पादन खर्चाची वाढ, तसेच कुटुंबातील विविध समस्या -ही सर्व कारणे शेतकऱ्यांना सावकारांकडून उधारी घेण्यासाठी भाग पाडत आहेत.

सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका आणि अन्य संस्थांकडून आधीच कर्ज घेतल्यामुळे शेतकऱ्यांना सावकारांकडे अत्यधिक व्याज दरावर कर्ज घेणे भाग पडते. या कर्जाच्या जाळ्यात अडकलेले शेतकरी सुरूवातीला सावकारांचे उच्च दरावरील व्याज देतात, मात्र नंतर त्यांनी घेतलेली कर्जाची मूळ रक्कम चुकवता येत नाही. त्यानंतर धमक्यांचे सत्र सुरू होते. काही शेतकरी मोठ्या प्रमाणावर जमीन किंवा संपत्ती विकून या फासातून सुटतात, परंतु लहान शेतकऱ्यांसाठी हे शक्य नाही. त्यांचे जीवन सावकारांच्या ताब्यात जात आहे, आणि ते अधिकाधिक कर्जाच्या जाळ्यात अडकत आहेत. सद्यस्थितीत महिलांचे शोषणही सुरू झाले आहे. कधी कधी, कर्ज न दिल्याने महिलांना मानसिक आणि शारीरिक त्रास दिला जात आहे. या सर्व संकटांमुळे शेतकऱ्यांवर तणाव वाढत आहे, ज्यामुळे काही लोक आत्महत्या देखील करत आहेत.

सावकारांपासून मुक्तीसाठी शेतकऱ्यांची मदत हवी

सध्या काही लोक सावकारांच्या छळामध्ये अडकल्याचे निदर्शनास येते. शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या सावकारांवर कारवाई होत असल्याचे वृत्त आहे. त्याचप्रमाणे काही स्थानिक संस्था व स्वयंसेवी गट सावकारांच्या जागी शेतकऱ्यांना सहकार्य करण्यासाठी पुढे आले आहेत. हे लक्षात घेता, शेतकऱ्यांना सावकारांच्या जाळ्यातून मुक्त करून त्यांना योग्य मार्गदर्शन आणि आर्थिक मदत देणे अत्यंत आवश्यक आहे

पान १ वरून...

बीडमध्ये दि. २४ मे रोजी भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन

न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ही रॅली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सुरू होईल. त्यानंतर सुभाष रोड मार्गे जात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करण्यात येणार आहे. शेवटी सीमारेषेवर मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली वाहून रॅलीचा समारोप होईल. या रॅलीमध्ये हजारो तरुण मोटारसायकलवर तिरंगा झेंडा हाती घेऊन सहभागी होणार आहेत. हे आयोजन केवळ एक कार्यक्रम नसून, जवानांच्या शौर्याला मानवंदना देणारी आणि एकतेची भावना जागवणारी लोकचळवळ ठरणार आहे.

क्षीरसागरांना उशिरा का होईना जाग आली का नक्की झोपच उडाली ?

बीड शहर बचाव मंचाच्या वतीने नितीन जायभाये यांचा संतप्त सवाल..!

बीड । प्रतिनिधी

नगरपालिकेच्या कारभारात पूर्णतः पारदर्शकता आलीच पाहिजे.पालिकेला मिळणारे शासनाचे फंड्स व सर्व मार्गाने येणारी वसुली व विनीयोग याचा हिशोब पब्लिश करा. नीताताई अंधारे मॅडम यांनी केलेल्या प्रचंड अंधारा नंतर उजेड पाडायला निघालेले दोन सोंगाडे दिवटे आत्तापर्यंत कुठे होते? क्षीरसागर जनता तळमळीने आक्रोश करीत असताना कुठे तोंड लपवून बसला होतात. एक बहाद्दर क्षीरसागर तर पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सुटण्याच्या आधीच श्रेय लाटण्यासाठी सुसाट वेगाने सुटले आहेत. बीड नगर परिषद मध्ये आता सोंगाड्यांचाही खेळ झाला चालू नगरपालिकेत कायम सत्ता तुमचीच, आताही पालकमंत्री तुमचाच, मग कोणी हंडा मोर्चा काढतोयत,तर कोणी निवेदनं देतोय ही सोंगं आणतायत कशाला ? नगरपालिका आहे का नोटंकी का सोंगाड्यांचा अड्डा?

एकीकडे बीड शहरातील जनता गेल्या अनेक वर्षांपासून अतिशय जीवघेण्या अशा झालेल्या भीषण समस्यांना सातत्याने तोंड देत आहे. गेल्या अनेक महिन्यापासून बीड शहरातील जनता पिण्याच्या पाण्यासाठी आक्रोश करीत आहे. ३२–३५ दिवस लोकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. सोंगाड्या नेत्यांनो एकीकडे तुमच्या मळ्यात पाण्याच्या पाईपलाईन गेल्या आहेत. सोंगाड्यांनो तुमच्या मळ्यात पाणी आहे लोकांच्या नळाला कधी येणार? पाण्याने भरलेली धरणं उशाला आणि जनतेच्या कोरड घशाला ह्या परिस्थितीचे जिम्मेदार कोण ? स्वतःला बीड शहराचे शिल्पकार म्हणविणाऱ्यांनो अजूनही बीड शहरातील साठ टक्के भागामध्ये रस्ते,नाल्या पिण्याच्या पाणीपुरवठ्याचे नळ हे झालेलेच नाहीत. लोकांना अजूनही मूलभूत सुविधाच मिळालेल्या नाहीत. या सर्व भागांमध्ये लाईटचे प्रश्नही आहेत. गेल्या ३० वर्षात अनेक वेळेस ह्याच भागांमधील रस्ते व नाल्यांची बोगस बिले उचलल्या गेली. इतर अनेक योजनांची बोगस बिले उचलल्या गेली.

हजारो– हजारो कोटींचा बेहिशोबी भ्रष्टाचार झाला. जनतेची वर्षानुवर्षे फसवणूक झाली, लूटच लूट करण्यात आली . मुस्लिम बहुल वार्डांमध्ये जीवन स्तर कमालीचा ढासळला आहे. अजूनही मूलभूत सुविधाच पुरविल्या गेलेल्या नाहीत. याचे शिल्पकारही क्षीरसागर घराणेच आहे. शहरांमध्ये सफाई,घंटा गाड्या पूर्णपणे बंद आहेत. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अजुनही सुरळीत झालेला नाही. त्यातच पुरवठा केला जाणाऱ्या पाण्याच्या शुद्धतेचा प्रश्नही ऐरणीवर आलेला आहे. एक बहाद्दर क्षीरसागर तर पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सुटण्याच्या आधीच श्रेय लाटण्यासाठी सुसाट वेगाने सुटले आहेत. क्षीरसागरांनी बीड शहरामध्ये गुत्तेदारी व्यवसायाच्या पलीकडे जाऊन कसलाही विकास केलेला नाही. गुत्तेदारी व ठेकेदारी व्यवसायासाठी बीड शहर हे क्षीरसागरांसाठी नेहमीच सोयीस्कर राहिलेले आहे. आजही शहरांमध्ये कुठेही स्त्रियांसाठी अद्यावत स्वच्छतागृहे नाहीत. शहरातील नागरिकांसाठी व लहान थोरांसाठी अद्यावत उद्याने नाहीत. नगरपालिकेकडून शिक्षण करा सारखे अवाजवी कर वसूल केल्या जातात. मोकाट जनावरे कुत्रे, आरोग्याची कामे ही फक्त कागदोपत्रीच होतात. बीड शहराला कसलाही आकारही नाही, उकारही नाही नुसती बकाल वस्ती करून ठेवली आहे. याचेही शिल्पकार क्षीरसागर घराणेच आहे. नगरपालिकेमध्ये बोकाळलेला भ्रष्टाचारही यांचीच देण आहे. जनतेच्या कळवळीचे सोंग घेऊन आलेले आजचे हेच क्षीरसागर व यांचे वडील यांच्या कार्यकाळामध्ये नगरसेवक राहिलेल्या नगरसेवकांचे कधीही जनतेच्या प्रश्नांवर दाभाड उचकटले नाही. गेल्या दोन वर्षापासून जनता अतिशय गंभीर समस्यांना तोंड देत असताना सुद्धा कोणत्याही क्षीरसागराच्या एकाही नगरसेवकाचे तोंड उघडले नाही. शहरामध्ये धानोरा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बलभीम चौक माळीवेस या रस्त्यांचे बजेट कुठे गेले? बार्शी नाका ते महालक्ष्मी बायपास चौक या रस्त्याचे काम अपूर्ण का आहे, नगर रोडच्या कामामध्ये यु टर्न ची मागणी मान्य का होत नाही, खूप मोठे रस्त्यांचे व नाल्यांचे प्रश्न प्रलंबित आहेत. बीड शहर हे घाणीचे साम्राज्य झालेले आहे. सगळीकडे सडलेल्या कचऱ्यांचे ढिगारे साचलेले आहेत. नाल्या सफाई पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे नाल्या तुडुंब भरलेल्या आहेत.

फवारणी आभावी साथीचे रोग घरोघर पसरलेले आहेत. शहराचे आरोग्य धोक्यात आहे. अशुद्ध आणि घाणेरड्या पाण्याचा पुरवठा नगरपालिकेकडून जनतेला होत आहे. कसलीही पावसाळा पूर्व तयारी शहरांमध्ये करण्यात आलेली नाही. पावसाळ्याची सुरुवात यावर्षी लवकरच होत आहे मग पूर्वतयारी कधी करणार..? एका श्रेय लाटत्या सोंगाड्याने तर गेल्या पाच वर्षात मुस्लिम वार्डांसाठी एक रुपयाही खर्च केलेला नाही. आता नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाल्यामुळे या सोंगाड्यां कंपनींच्या झोपाच उडाल्या आहेत. गेल्या ३५ ते ४० वर्षात बीड शहराच्या केलेल्या लुटीचा हिशोब बीडची जनता घेतल्याशिवाय राहणार नाही.

लिंबागणेश शिवारात पवनचक्की रखवालदाराने केलेल्या गोळीबार; एकाचा मृत्यू

लिंबागणेश । प्रतिनिधी

आज सकाळी लिंबागणेश परीसरातील मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्गावरील लिंबागणेश आणि महाजनवाडी शिवारात असलेल्या पवनचक्की रखवालदाराने दिलेल्या माहितीनुसार मध्यरात्री चोरी करण्याच्या उद्देशाने काही लाठ्या काठ्या धारी माणसं आली होती त्यामुळे रखवालदाराने केलेल्या गोळीबारात एकाचा जागीच मृत्यू झाला. सदरील ईसमाचे प्रेत जवळच्या महाजनवाडी शिवारातील झाडीत शेळ्या चारणा–या शेतकऱ्यांने पाहिले असता आरडाओरडा केला.सदरची माहिती ग्रामस्थांनी नेकनुर पोलिस स्टेशनचे प्रभारी चंद्रकांत गोसावी यांना कळवली. सपोनि चंद्रकांत गोसावी आणि त्यांची टीम घटना स्थळी दाखल झाली असुन स्थळपंचनामा आणि पुढील चौकशी सुरू असुन सदरील अज्ञात प्रेत पारधी समाजाचे असु शकते अशी प्राथमिक माहिती असुन पुढील तपास सुरू आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कमानीसाठी महिलांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू

परळी । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई मुंडे तसेच माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या परळी तालुक्यात बौद्ध समाजावर अन्याय होताना दिसून येत आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व बहुजन समाजाचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कमान उभारण्यासाठी परवानगी द्यावी या मागणीसाठी आज दि.२० मे पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बौद्ध समाजाच्या वतीने महिला, लेकरा बाळासह उपोषण सुरू करण्यात आले आहे. दरम्यान बीड शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या वतीने पाच उपोषणकर्त्यांना परवानगी दिली असून भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १६८ नुसार नोटीसही दिली आहे.

याबाबत परळी तालुक्यातील दौनापूर येथील बौद्ध समाजाने बीड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. या निवेदनात म्हंटले होते की, दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी दौनापूर येथील बौद्ध समाजाच्या वतीने ग्रामपंचायतीला बौद्ध वस्ती समोरील रस्त्यावर प्रवेशद्वार अर्थातच कमान उभारण्याची परवानगी मागण्यासाठी अर्ज केला. त्यावर ग्रामपंचायतीने परवानगी तर दिलीच नाही उलट सरपंच राजेभाऊ प्रभाकर आघाव यांनी ग्रामपंचायतीचा ठराव घेतला. व ठरावा द्वारे कमानीला परवानगी देण्यात येणार नाही असे सांगितले होते.त्यानंतर दौनापूर येथील बौद्ध समाजाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेशद्वार, (कमान) करण्याची परवानगी द्यावी अन्यथा २० मे पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. दिलेल्या निवेदनानुसार वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे तसेच उपोषण कर्ते रामचंद्र भगवान घाडगे, चंद्रमुनी रामकिशन घाडगे, रामचंद्र दिलीप बनसोडे, हरिभाऊ साधू घाडगे, किशन अच्युत घाडगे यांच्यासह रोहिदास घाडगे, लक्ष्मण घाडगे, नागुराव गायकवाड, दिलीप बनसोडे, कोंडीराम घाडगे, कमलाकर घाडगे, एडवोकेट विवेक वैद्य, धनंजय घाडगे, दीपक बनसोडे, सुजित घाडगे, फुलचंद घाडगे, सचिन घाडगे, महेंद्र घाडगे, छगन घाडगे, कालिंदा घाडगे, रेखा घाडगे, कावेराबाई घाडगे, वैजयंती घाडगे, मोहिनी घाडगे, रेखा बनसोडे, मंदाबाई वाव्हळे आदी उपोषणाला बसले आहेत. दरम्यान या उपोषणावर जिल्हा प्रशासन तसेच उपोषण सोडविण्यासाठी आणि कमानीला परवानगी द्यावी यासाठी पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे तसेच आमदार धनंजय मुंडेहे काय भूमिका घेतात याकडेही जिल्ह्यातील बौद्ध समाजाचे लक्ष लागले आहे.

रिक्षामधील प्रवाशाला लुटल्याचा आरोप, आरोपीची निर्दोष मुक्तता:अँड सुरेश वडमारे

बीड । प्रतिनिधी

दि. १३/०७/२०१८ रोजी फिर्यादी हा पिंपरगव्हाण येथुन बीड येथे दवाखान्यात जाण्यासाठी व त्यानंतर पंढरपूर येथील दिंडी मधे जान्यासाठी दुपारी १२ वा. सुमारास बीड बस स्टँडला आला होतां आणि रिक्षाचालक – हिरामन वडमारे याने फिर्यादीस मामा तुम्हाला कुठे जायचे आहे ? त्यावर फिर्यादीने चराटा येथे जायचे आहे असे सांगीतले व फिर्यादी हा आरोपी च्या रिक्षा मधे बसला व आरोपीने फिर्यादी प्रवाशास नगर नाक्याच्या डाव्या बाजुने शिवसंग्राम पक्षच्या ऑफिसच्या पाठीमागे १२.३० वा. झाडामधे नेले व लोखंडी टांबी दाखवून हाताने गचुरे धरून तुझे जवळील सगळे पैश दे, नाहीतर तुला जिवे मारीन अशी धमकी दिली व फीर्यादी प्रवाशाच्या खिश्यामधील रोख रु. १५३०/ जबरीने काढून घेतले व आरोपी रिक्षा चालक निघून गेला, अशा प्रकारची फिर्याद पोलीस स्टेशन शिवाजीनगर, बीड येथे रिक्षा चालका विरुद्ध दिली होती व गुन्हा क्र. ४६२/१८ हा कलम– ३९२ ,५०६ भा.द. वि. अन्वये दारवल झाला होता .प्रकरणात चार्जशीट दारवल झाले व फिर्यादीची महत्त्वपूर्ण साक्ष झाली परंतु फिर्यादी पक्ष आरोपीचे विरुद्ध गुन्हा सिद्ध कर शकला नाही. न्यायालयाने आरोपीस संशयाचा फायदा देत आरोपीची निर्दोष मुक्तता केली. आरोपीचे वतीने मा.कोर्टासमोर अँड. सुरेश वडमारे यांनी बाजू मांडली. त्यांना अँड. राहुल साळवे, अँड अशोक शेटे, अँड गौतम कांडेकर, अँड सत्यनारायण ढाका यांचे सहकार्य लाभले.

शेतकरी जनहित कामगार मंचच्या वतीने विभागीय वन अधिकारी कार्यालय बीड येथे आमरण उपोषणाचा इशारा

धारूर । प्रतिनिधी

शेतकरी जनहित कामगार मंचच्या वतीने किल्ले धारूर येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना ०२ मे रोजी निवेदन दिले होते. २२ दिवस उलटून गेले मात्र अधिकाऱ्यांनीही या निवेदनाला गांभीर्याने घेतलेले दिसत नाही.

मौजे गोपाळपूर ता.धारूर येथील सर्वे नं.५१६ व ५२२ मधील सी.सी.टी.च्या कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्यात आली होती, तिला देखील बगल देण्यात आलेली आहे. तसेच अवैध रित्या वृक्ष तोड निरंतर सुरू आहे. यामध्ये वनमजूर श्री.वचिष्ठ भालेराव यांच्यावर अजून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसून धारूर परिक्षेत्रातील आरा मशीनमध्ये अवैध लाकडांचा साठा मोठ्या प्रमाणात असून त्यांना सहकार्य करणारे अधिकारी व कर्मचारी कोणाच्या आशीर्वादाने खुलेआम झाडांची कत्तल करतात. यांना नेमकं कोणाच पाठबळ आहे? असा सवाल शेतकरी जनहित कामगार मंचचे नेते राहुलजी रोकडे यांनी केला आहे.

या संदर्भात संबंधितांवर योग्य कारवाई झाली नाही, तर शेतकरी जनहित कामगार मंचच्या वतीने विभागीय वन अधिकारी कार्यालय बीड येथे दि. २६/०५/२०२५ रोजी आमरण उपोषण करण्यात येणार असून शेतकरी जनहित कामगार मंचाचे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे यावेळी बोलतांना राहुल रोकडे यांनी स्पष्ट केले.

दौवनापूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कमानीला विरोध : शैलेंद्र पोटभरे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील दोवनापुर येथील प्रवेशद्वारासाठी उपोषण कृत्यांना पाठींबा देण्यासाठी व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कमान व्हावी यासाठी उपोषण कर्त्यांना रिपाई एकतावादी चा पाठिंबा शैलेंद्र पोटभरे वार्ता बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोजे दौवनापुर तालुका परळी येथील समाज बांधव महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची कमान गावामध्ये झाली पाहिजे गेल्या दोन दिवसापासून उपोषणात बसले असून या उपोषणास रिपाई एकतावादी च्या वतीने जाहीर पाठिंबा बीड जिल्हाध्यक्ष मराठवाडा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी दिला.

गावामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कमान व्हावी म्हणून ग्रामपंचायतला परवानगी मागितली परंतु ग्रामपंचायतचे सरपंच यांनी परवानगी दिली नाही त्यांनी सांगितले की महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कमानीला गावातील दोन व्यक्ती विरोध करतात या मुळे आम्ही पण परवानगी देत नाहीत या पद्धतीची भूमिका सरपंच यांनी घेतली ज्या महामानव डॉ. बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून सर्व घटकांना न्याय दिला. त्याच महामानवाच्या कमानीला एवढा जातीय विरोध हे अत्यंत भयानक असून तात्काळ शासनाने त्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भव्य दिव्या कमान उभा करण्याची परवानगी देण्यात यावी अशी मागणी रिपाई एकतावादी चे बीड जिल्हाध्यक्ष मराठवाडा अध्यक्ष शैलेंद्र पोटभर यांनी केली आहे.

श्री तपोनिधी पंचायती आनंद आखाडा च्या धर्माचार्य पदी श्रीहरी महाराज पवार यांच्या नावाची घोषणा

बीड । प्रतिनिधी

महंत गणेशानंद सरस्वती महाराज (सचिव,श्री तपोनिधी पंचायती आनंद आखाडा) यांच्या नेतृत्वाखाली व अमृताश्रम स्वामी महाराज (श्री क्षेत्र नवगण राजुरी) यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.ह.भ.प.गुरुवर्य श्रीहरी महाराज पवार (श्री क्षेत्र दत्त संस्थान, कोल्हारवाडी फाटा, बार्शी रोड, बीड चे विद्यमान मठाधिपती) यांना आखाड्याचे धर्माचार्य पद घोषित करण्यात आले आहे येणारया २०२७ च्या कुंभमेळ्याच्या अगोदर महाराजांना पद बहाल करण्याचा भव्यदिव्य कार्यक्रम आखाड्याच्या वतिने आयोजित करण्यात येणार आहे.

श्री तपोनिधी पंचायती आनंद आखाडा (प्रयाग,हरिव्दार,उज्जैन, त्र्यंबकेश्वर) भारतातील १३ आखाड्यापैकी एक व महाराष्ट्रतील एकमेव आखाडा आहेया आखाड्याच्या मार्गदर्शनाखाली १९६८, १९८०, २००३ आणि २०१५ सालचे त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळे संपन्न झालेले आहेत व येणारा २०२७ चा कुंभमेळा संपन्न होणार आहे. या आखाड्याच्या वतिने गुरुवर्य श्रीहरी महाराज पवार यांच्या सर्व धार्मिक कार्यांची दखल घेऊन सर्व संत महंतांच्या उपस्थितीमध्ये धर्माचार्य पद घोषित केले यावेळी महंत गणेशानंद सरस्वती महाराज, अमृताश्रम स्वामी महाराज, शिवानंद स्वामी महाराज, आदित्य स्वामी महाराज, औदुंबरानंद स्वामी महाराज, नवनाथ महाराज व इतर भक्तमंडळी उपस्थित होते, लवकरच कार्यक्रम आयोजित करून पद बहाल केले जाणार आहे अशी माहिती अमृताश्रम स्वामी महाराज यांनी दिली आहे.

आज माझ्या लोककल्याणकारी कामाची पावती मिळाली,अशीच सेवा कायम संस्थान व आखाड्याच्या माध्यमातून माझ्याकडून होत राहो अशी भावना श्रीहरी महाराज पवार यांनी व्यक्त करून सर्व साधु–संत–महंताचे आभार मानले.

जागतिक कुस्ती दिवस दरवर्षी २३ मे रोजी साजरा केला जातो : बाजीराव ढाकणे

बीड । प्रतिनिधी

हा दिवस २३ मे १९०४ रोजी व्हिएन्ना, ऑस्ट्रिया येथे झालेल्या पहिल्या ग्रीको–रोमन कुस्ती विश्व अजिंक्यपद स्पर्धेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. जागतिक कुस्ती दिवसाचे महत्त्व – या दिवशी कुस्ती या प्राचीन आणि प्रतिष्ठित खेळाचा जागतिक स्तरावर गौरव केला जातो. कुस्ती ही केवळ शारीरिक ताकद आणि कौशल्याचा खेळ नसून, ती शिस्त, सहनशक्ती, रणनीती आणि परस्पर सन्मान यांसारख्या मूल्यांचे प्रतीक आहे. या दिवशी विविध देशांमध्ये कुस्ती स्पर्धा, कार्यशाळा आणि जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

भारतातील उत्सव

भारतामध्येही जागतिक कुस्ती दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. उदाहरणार्थ, पुणे येथे २३ मे २०२२ रोजी पारंपरिक मातीच्या आखाड्यात सामूहिक कुस्ती सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

जागतिक कुस्ती महिना

मे महिना संपूर्णपणे 'जागतिक कुस्ती महिना' म्हणून ओळखला जातो. या महिन्यात विविध कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून कुस्तीच्या विविध प्रकारांचा प्रचार आणि प्रसार केला जातो.

आज, २३ मे २०२५, शुक्रवार, आपण जागतिक कुस्ती दिवस साजरा करत आहोत. या निमित्ताने आपण कुस्तीच्या परंपरेचा सन्मान करूया आणि या खेळाच्या माध्यमातून शिस्त, ताकद आणि सन्मान यांसारख्या मूल्यांना प्रोत्साहन देऊया असे मत बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे. कुस्ती हा एक प्राचीन आणि लोकप्रिय मैदानी खेळ आहे. हा खेळ दोन प्रतिस्पर्ध्यांमध्ये खेळला जातो, ज्यामध्ये प्रत्येक खेळाडू दुसऱ्याला जमिनीवर पाडण्याचा आणि त्याला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतो. हा खेळ केवळ ताकदावर नाही, तर तंत्र, चपळता, मानसिक स्थैर्य आणि रणनीतीवर आधारित असतो असे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले.

कुस्ती खेळाचा इतिहास प्राचीन काळ:

कुस्तीचा इतिहास खूप जुना आहे. पुरातन ग्रीस, रोम, भारत, मिस्त्र, मेसोपोटेमिया या

संस्कृतींमध्येही या खेळाचा उल्लेख आहे.

भारतामधील कुस्ती (मल्लयुद्ध):

भारतात कुस्तीला मल्लयुद्ध असे म्हणतात. महाभारतात भीम, दुर्योधन यांसारख्या योद्ध्यांनी कुस्ती खेळल्याचा उल्लेख आहे. पुराणांमध्ये कुस्तीला एक शौर्यप्रद खेळ मानले जाते.

कुस्तीचे प्रकार

१. फ्रीस्टाईल कुस्ती : यात पाय आणि पायांचा वापर करण्यास परवानगी असते. भारतातील अनेक खेळाडू फ्रीस्टाईलमध्ये भाग घेतात.

२. ग्रीको–रोमन कुस्ती : या प्रकारात पाय वापरण्यास मनाई असते. फक्त कंबरेवरच्या भागावर आक्रमण करता येते.

३. पारंपरिक मातीतील कुस्ती (आखाडा) : भारतात पारंपरिक कुस्ती मातीच्या आखाड्यात खेळली जाते. हे अधिक शिस्तबद्ध आणि शारीरिक प्रशिक्षणावर आधारित असते.

कुस्तीचे नियम – कुस्ती एका विशिष्ट गादी (रिंग) वर खेळली जाते. सामना दोन किंवा तीन राउंड्सचा असतो. प्रत्येक राउंडमध्ये खेळाडूने दुसऱ्याला पिन करणे किंवा गुण मिळवणे आवश्यक असते. नियमांचे उल्लंघन केल्यास दंड मिळतो किंवा अपात्र ठरवले जाऊ शकते.

कुस्तीतील महत्त्वाचे कौशल्ये

ताकद आणि सहनशक्ती चपळता आणि लवचिकता समतोल राखण्याची क्षमता, आक्रमण आणि बचाव यामधील समतोल, मानसिक स्थैर्य आणि रणनीती, भारताचे प्रसिद्ध कुस्तीपटू, खाशाबा जाधव: भारताचा पहिला वैयक्तिक ऑलिंपिक पदक विजेता (१९५२)., सुशील कुमार: दोनदा ऑलिंपिक पदक विजेता. योगेश्वर दत्त, बजरंग पुनिया, विनेश फोगाट, साक्षी मलिक: आंतरराष्ट्रीय पदक विजेते.

कुस्तीचे फायदे

शरीराला मजबुती आणि लवचिकता प्राप्त होते. मन:शांती आणि एकाग्रता वाढते. सामाजिक शिस्त आणि सहकार्य शिकायला मिळते. आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण वाढतात. कुस्ती हा खेळ केवळ एक स्पर्धात्मक खेळ नसून, तो एक जीवनपद्धती आहे. भारतात आणि जगभरात या खेळाची प्रतिष्ठा आहे. कुस्तीमधून केवळ शरीर नव्हे तर मनही घडते. या खेळाला प्रोत्साहन देणे म्हणजे आपल्या परंपरेला आणि आरोग्याला सन्मान देणे होय.

श्री बाजीराव ढाकणे

बीड जिल्हा समन्वयक, महाएनजिओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्य ९४२१९८९९०९

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब उघडा डोळे बघा नीट...

गेवराईत संजय गांधी निराधार विभागाचा बट्ट्याबोळ दलालांशिवाय होईनात कामे?

- खासदार बजरंग सोनवणे साहेब, तुम्हीच निराधारांना न्याय मिळवून द्यावा?
- एजंटांचा सुळसुळाट; अधिकाऱ्यांनी घातलाय काळा चश्मा?
- दलालांची अधिकाऱ्यांसोबत संगीत खुर्ची खऱ्याखुऱ्या लाभार्थ्यांना योजनेपासून बुडकी?
- वारे व्वा तहसीलदार कंत्राटीच्या ताब्यात निराधारांचा कारभार?
- खऱ्याला सुरी खोट्याला पुरी मूकबधिर भागवत गाभुड अद्यापही वंचितच

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तहसील कार्यालयामध्ये दलाल असल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागत आहे. तहसील प्रशासकीय कामात अधिकारी कर्मचारी यांच्याकडून काम न झाल्यामुळे अनेकदा दलालांचा सहारा घेतल्याशिवाय कामे होत नाहीत, ज्यामुळे नागरिकांची आर्थिक लूट होते. तहसील कार्यालयात दलाल मोठ्या प्रमाणावर सक्रिय झाले आहेत. ते विविध प्रकारच्या कामांसाठी नागरिकांकडून जास्त पैसे घेतात. अनेकदा, दलालांच्या मदतीशिवाय कामे होत नाहीत, ज्यामुळे नागरिकांना त्यांच्यावर अवलंबून राहावे लागते. असाच प्रकार गेवराई येथील तहसील कार्यालयात संजय गांधी श्रावण बाळ या विभागात मोठ्या प्रमाणात होत आहे. महाराष्ट्र राज्य सरकारकडून गरजवंतांना व खऱ्या लाभार्थ्यांना लाभ मिळावा यासाठी महाडीबीटी अंतर्गत संजय गांधी व श्रावण बाळ योजनेच्या माध्यमांतून सरकारकडून न्याय मिळवून देण्यासाठी सदैव प्रयत्न आहेत. मात्र येथील तहसील कार्यालयातील संजय गांधी व श्रावण बाळ या विभागाला दलालांनी आपल्या विळख्यात घेतले असून कर्मचारीही त्यांच्या इशार्यावर शासकीय कामकाज करताना दिसून येतात. सर्वसामान्यांना विविध शासकीय कागदपत्रे काढण्यासाठी दलालांचा सहारा घ्यावा लागत आहे. पर्यायाने सर्वसामान्यांची मोठी आर्थिक लूट होत आहे. ग्रामीण भागातील अंध, अपंग, वयोवृद्ध नागरिकांना तुमची महाडीबीटीच्या माध्यमातून पगार सुरू करु असे म्हणून दलाला कडून लुट केली जाते प्रत्येकाचे काही ना काही काम असते. त्यामुळे गेवराई तहसील कार्यालयाला दलालांचे चांगलेच वर्तुळ तयार झालेलं दिसत आहे. गेवराई तहसील कार्यालय हे दलालांमुळे नेहमीच चर्चेत राहिलेले आहे. ग्रामीण भागासह शहरातील गोरगरिबांना फसवून तसेच बेकायदेशीर कामे करून या दलालांनी अनेकांना लुबाडले आहे. तहसील कार्यालयाच्या वतीने देण्यात येणार्या बोगस मंजुरी पत्रापासून ते महाडीबीटी पर्यंत तसेच उत्पन्न व जात प्रमाणपत्राच्या

कागदपत्रांसाठी विद्यार्थ्यांची नागरिकांची गर्दी असते.एजंटांचा सुळसुळाट;अधिकाऱ्यांनी घातलाय काळा चश्मा अश्या भूमिकेत वावरणारे तहसीलदार निराधारंच्या प्रश्नांवर का बसले गार? या संजय गांधी श्रावण बाळ विभागाच्या कार्यालयात खुशाल दलाल खुर्ची टाकून बसतात आणि आपले कामे करून घेतात असे म्हणतात ना खऱ्याला सुरी आणि खोट्याला पुरी अशाप्रकारे गेवराई च्या तहसील कार्यालयात निराधारांच्या योजनेचा खेळ मांडलाय काही लाभार्थ्यांना खात्यात अनुदान वर्ग झाले तर काही लाभार्थ्यांना अनुदान आलेच नाही या विषयावर कार्यालयात चौकशीला गेलेल्या लाभार्थ्याला उडवा उडवीचे उत्तरे दिली जातात तसेच गेल्या अनेक वर्षापासून तहसीलच्या दारात आपल्या हक्काचे अनुदान मिळावे यासाठी आतुरतेने वाट पाहणारा मूकबधिर भागवत चंद्रकांत गाभूड या युवकांनी सातत्याने अनेक वेळा अर्ज सादर करून सुद्धा या योजनेतून त्यांना लाभ मिळत नाही हे दुर्दैव आहे. जर खऱ्या गरजवंताला वाट बघावी लागते आणि खोट्यांला लाभ देणाऱ्या या निष्क्रिय कर्मचारी अधिकाऱ्यांना कर्तव्यातून बाद करायला हवं त्यांतच तहसील प्रशासनाने वारे व्वा तहसीलदार कंत्राटीच्या ताब्यात निराधारांचा कारभार आश्चर्याचा धक्काच दिला आहे.

समितीचे बगलबच्चे यांचा कारभार म्हणजे आपणा काम बनता तो भहाड मे जाई जनता!तहसील कार्यालयात येणार्या सामान्यांना टिपण्यात दलालवर्ग तरबेज झाला आहे. कमी वेळेत काम करून देण्याचे आमिष दाखवत लाभार्थींना आपल्याकडे खेचण्याचे प्रकारही घडत आहेत. तसेच शासनाच्या योजना दलालांच्या विळख्यात सापडल्या आहे.दलालांशिवाय पानही हालत नसल्याचे दिसून येत आहे याकडे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणेयांनी या प्रकरणी लक्ष्य घालावें आणि खऱ्या लाभार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी होत आहे.

तुमच्यासाठी जे जे चांगलयं, ते करण्याचा माझा प्रयत्न

ना. पंकजाताई मुंडेंचे 'रामटेक' निवासस्थानी कार्यकर्त्यांशी हितगूज

मुंबई । प्रतिनिधी

राजकारण, समाजकारण करत असताना माझ्या संकटात आणि विजयात तुम्ही तेवढेच साक्षीदार आहात. तुमच्यामुळेच मी आज इथपर्यंत पोहोचले आहे, त्यामुळे तुमच्यासाठी जे जे काही चांगलं असेल ते करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. जन सामान्यांची कामं आणि सर्वांना बळ देण्याचं काम 'रामटेक' मधून होईल अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी हितगूज साधलं.

बीड जिल्हयातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसाठी मुंबईतील रामटेक या शासकीय निवासस्थानी ना. पंकजाताई मुंडे यांनी एक छोटेखानी कौटुंबिक स्नेहमिलन कार्यक्रम काल आयोजित केला होता, त्यावेळी त्या बोलत होत्या. आई प्रज्ञाताई मुंडे

यावेळी आवर्जून उपस्थित होत्या.

ना. पंकजाताई मुंडे पुढे बोलताना म्हणाल्या, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब उप मुख्यमंत्री असताना याच रामटेक निवासस्थानी माझं बालपण गेलं, त्यानंतर तब्बल तीस वर्षांनंतर मी या बंगल्यात रहायला आले, याठिकाणी मुंडे साहेबांचा फोटो लागला आणि आपल्या सर्वांचे पांग फिटले. आज माझी आई इथे उपस्थित आहे, प्रत्येक आईला आपली मुलगी मोठी व्हावी असे वाटते. आपली मुलगी सर्वांच्या भल्यासाठी काम करत आहे असा विश्वास तीला आहे.

सर्वांना बळ देऊ

राजकारणात काम करत असताना आतापर्यंत अनेक चढ उतार अनुभवले. कटू प्रसंगानंतर गोड अनुभव देखील आले. सर्व काळात तुमचा पाठिंबा आणि साथ मला लाभली. माझ्या जिल्हयातील कार्यकर्ता स्वाभिमानी आहे. तुमच्यासाठी जे जे चांगले आहे, ते करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. या बंगल्यातून सर्वांना बळ देण्याचे काम होईल. नाव माझे असले तरी बंगला तुमचा आहे, त्यामुळे तुमच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी मी कटिबध्द आहे असं ना. पंकजाताई म्हणाल्या.

आ. नमिताताई मुंदडा, माजी आमदार आर.टी. देशमुख, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, रमेश कराड, दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष मकरंद पत्की, राजेश्वर देशमुख, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ज्येष्ठ नेते श्रीहरी मुंडे, जीवराज ढाकणे, शिवाजीराव गुट्टे, जिल्ह्यातील सर्व सर्व आजी माजी तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, मंडल अध्यक्ष, बँकेचे संचालक, सरपंच, लोकप्रतिनिधींसह पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

आता मनसे राबवणार रोषणपुरी ते छोटेवाडी रस्त्याचे मजबुतीकरण होईपर्यंत उपोषण मोहीम : जाधव

माजलगाव । प्रतिनिधी

काल दि १९ रोजी मनसे ने दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, दि.३०ऑगस्ट २०२४ रोजी नॅशनल हायवे रोषणपुरी फाटा या ठिकाणी या रस्त्या संदर्भात रस्ता रोको आंदोलन करण्यात आलेले होते. त्यावेळी त्यांनी संबंधित कार्यालयाने लेखी आश्वासन दिले होते की, पाऊस संपताच आम्ही या रस्त्याचे मजबुतीकरण करुन देऊत.मात्र या गोष्टी चा संमधीत विभागाला पुर्णतः विसर पडला आहे त्यांनी आजतागायत त्या रस्त्यावर कुठल्याही प्रकारचे काम केलेले नाही. पाऊस पडल्यानंतर त्या रस्त्याने जाता येत नाही व शेतीची मशागत करता येत नाही. (शेतकऱ्यांना वाहने नेता येत नाहीत. बैलगाडीपण जात नाही. खत, बियाणे नेता येत जलगाव एवढेच नाही तर पायी पण त्या रस्त्याने जाता येत नाही. आशी आवस्था त्या म.म ज. याची होते. यासाठी आम्ही संबंधित कार्यालयात कळविलेले आहे व

आंदोलनही केलेले आहे. तरी या रस्त्याकडे दुर्लक्ष होत आसल्यामुळे सर्व शेतकऱ्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेनचे महाराष्ट्र सैनिक हे दि.२३ मे २०२५ रोजी बुवाजीबुवा महाराज यांच्या पादुका या ठिकाणी मनसे स्टाईल उपोषण करणार आहोत. तरी यात काही अनुचित प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालयावर राहील, असे दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे. निवेदनावर धोंडीराम जाधव, गणेश वाघमारे, आत्माराम ढिसळे, पांडुरंग जाधव, कैलास जाधव, नितीन गावडे, अशोक आगे आदी सह सुमारे पन्नास ते साठ जणांच्या साह्या आहेत.

दलित वस्तीतील बोगस कामाच्या चौकशीच्या मागणीसाठी २८ मे रोजी पं.स.च्या आवारात जनावरे सोडणार : गवळी

परळी । प्रतिनिधी

परळी पंचायत समिती व जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंबाजोगाई यांच्या वतीने परळी तालुक्यात करण्यात आलेल्या दलित वस्तीतील बोगस कामांची चौकशी करून कारवाई करावी अन्यथा दिनांक २८ मे रोजी परळी पंचायत समितीच्या आवारात जनावरे सोडून अनोखे आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते मुक्ताराम गवळी यांनी दिला आहे.

याबाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती, परळी यांना दिलेल्या निवेदनात गवळी यांनी म्हटले आहे की, आपल्या कार्यालयाच्या वतीने तसेच जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, अंबाजोगाई यांनी परळी तालुक्यातील दलित वस्तीचा निधी इतरत्र वळविला आहे. तसेच जे कामे केली आहेत ती बोगस आहेत. बोगस कामे करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. या सर्व कामांच्या चौकशीसाठी यापूर्वी मुक्ताराम गवळी यांनी बीड जिल्हाधिकारी यांना ४ मार्च २०२५ रोजी निवेदन दिले होते. परंतू त्यांवर कोणतीही कारवाई केलेली नाही.

त्यामुळे दिनांक २६ मे पर्यंत कारवाई झाली नाही तर दिनांक २८ मे रोजी परळी पंचायत समितीच्या आवारात गाय, बैल, म्हैस, शेळी, कुत्रे, मांजर, आदी जनावरे सोडून आंदोलन करणार असल्याचे मुक्ताराम गवळी यांनी म्हटले आहे. गवळी यांच्या वेगळ्या आंदोलनाची सर्वत्र चर्चा होत आहे.

माजलगाव तालुक्यात अवकाळी पावसाचा तडाखा

शुक्लतिर्थ लिमगावात वीज पडून शेतकरी व एक म्हैस जागीच मृत्यूमुखी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यामध्ये सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास अवकाळी पाऊस विजेच्या व विजेच्या गडगडाटासह जोरदार वादळामध्ये शुक्ल तीर्थ लिमगाव येथे वीज पडल्याने शेतकरी अशोक लिंबाजी शेरकर (वय ५१) यांचा आणि एका म्हशीचा मृत्यू झाला आहे. सविस्तर माहिती अशी की माजलगाव तालुक्यात काल दि.१९ मे २०२५ रोजी दुपारी चार वाजल्यापासून ढगाळ वातावरण निर्माण झाले होते.

काही भागांमध्ये ४ ते ५ च्या दरम्यान अवकाळी पावसाला सुरुवात झाली.

त्याचप्रमाणे तालुक्यातील शुक्ल तीर्थ लिमगाव परिसरामध्ये देखील सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास अवकाळी पाऊस सुरू झाला. जोरदार वादळासह विजेचा गडगडाट सुरू होता. यावेळी शेतामध्ये आपली म्हैस गोठ्यात बांधण्यासाठी गेलेले शेतकरी अशोक लिंबाजी शेरकर यांच्यावर व म्हैस वर वीज पडली. यावेळी म्हैस जागीच दगावली. त्याच अवस्थेत अशोक शेरकर यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली असता त्यांना मृत घोषित केले. रुग्णालय प्रशासनाने याबाबत ग्रामीण पोलीसाना या बाबत माहिती दिली. ग्रामीण पोलिसांनी याबाबत अकस्मात मृत्यूची नोंद केली. दि.२० मे २०२५ रोजी अशोक लिंबाजी शेरकर यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात आई वडील पत्नी दोन मुली एक मुलगा असा परिवार आहे.

अँट्रोसिटीच्या प्रकरणात आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर : अॅड.सुरेश वडमारे

बीड, पाटोदा । प्रतिनिधी

दि.१६/०१/२०२५ रोजी रात्री १२-३० वाजता मी बसस्टँड पाटोदा येथुन नफरवाडीकडे निघालो

असता-विवेक जाधव, बाबू गर्जे व इतर १ जनाने मला त्यांची गाडी आडवी लावली व जातीवाचक शिवीगाळ केली व तुझी लायकी काय? असे म्हणत विवेक जाधव रा.पाटोदा याने त्याच्या हातातील लोखंडी कडे माझ्या डोक्यात मारुन जखमी केले व इतरानी लाथा बुक्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या व साक्षीदारांनी भांडन सोडवले अशी फिर्याद फिर्यादीने पोलिस स्टेशन पाटोदा येथे दाखल केली होती. गुन्हा क्र. २५/२०२५ कलम-३(१)(२), अँट्रोसिटी ऍक्ट, आणि ३५१(२) ३५१(३), ३५२भारतीय न्याय्य संहीता- २०२३ अन्वये दाखल झाला होता. यामधील मुख्य आरोपी विजय जाधव रा. पाटोदा जि. बीड यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मा. बीड सेशन्स कोर्टासमोर अँड. सुरेश वडमारे यांनी दाखल केला. मा. सेशन्स कोर्टाने सरकारपक्षाची बाजू ऐकून घेऊन, फिर्यादीची बाजू ऐकुन घेऊन व आरोपीची बाजू ऐकून घेतली व आरोपी विवेक जाधव रा. पाटोदा जि. बीड यास अटकपूर्व जामीन मंजूर केला. आरोपीचे वतीने युक्तीवाद अँड. सुरेश वडमारे (बीड) यांनी केला व प्रभावी बाजू मांडली. सदर घटना ही पाटोदा येथील असल्यामुळे पाटोदा शहरात चर्चा होती. अँड.सुरेश वडमारे याचे अभिनंदन होत आहे.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या नागरी सत्कार निमित्त बहुसंख्येने उपस्थित रहा : दीपक घायाळ

माजलगाव । प्रतिनिधी

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री ना. संजयजी शिरसाट यांचे माजलगाव नगरीमध्ये भव्य दिव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आलेले आहे तरी हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे माजलगाव तालुका उपाध्यक्ष दीपक घायाळ यांच्यावतीने करण्यात आलेले आहे.

सामाजिक न्याय मंत्री तथा संभाजीनगरचे पालकमंत्री ना. संजयजी शिरसाठ यांची निवड झाल्याबद्दल माजलगाव मध्ये प्रथमच त्यांचे पदार्पण होत असून त्यांच्या भव्य दिव्य नागरिक सत्काराचे आयोजन

करण्यात आलेले असून दि. २४ रोजी बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे हे आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन माजलगाव शहरातील जुना मोंढा या ठिकाणी करण्यात आलेले असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय बाबुरावजी पोटभरे साहेब यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच या कार्यक्रमास परळी मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे, माजलगाव मतदार संघाची आमदार प्रकाश सोळुंके, आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस, गेवराई मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित, केज मतदार संघाचे आमदार नमिता मुंदडा तसेच शिवसेनेच्या युवा नेत्या हर्षदा सिरसट या उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष दीपक घायाळ यांनी केले आहे.

विनय महाले यांना पीएच.डी. प्रदान

कन्नड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने विनय आनंदराव महाले यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. श्री. विनय महाले यांनी विवेकानंद महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील प्रोफेसर डॉ. आर.जी. दोरीक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला होता. त्यांनी आपल्या संशोधन प्रबंधामध्ये कॅरेक्टरायझेशन स्टडीज ऑफ सम नॅनोक्रिस्टलिन सबस्टिट्यूटेड स्पिनेल फेराइट सिस्टिम्स Characterization Studies of Some Nanocrystalline Substituted Spinel Ferrite Systems

याविषयावर संशोधनात्मक अभ्यास केला त्यासाठी विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी बहाल केली आहे.या संशोधन कार्यात प्रो. डॉ. के. एम. जाधव, माजी विभाग प्रमुख, भौतिकशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

श्री. विनय महाले हे कन्नड तालुक्यातील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. ए. के. महाले साहेब औराळकर यांचे चिरंजीव आहेत. या यशाबद्दल विवेकानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्रीमंतरावजी शिसोदे, प्रचार्य डॉ. दादाराव शेंगुळे, डॉ.रुपेश मोरे यांनी अभिनंदन केले. तसेच विविध स्तरांतील मान्यवरांकडून शुभेच्छा मिळत आहेत.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT